
INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 5 | JUNE – 2025

# ''दिव्यांग आणि त्यांचे संवैधानिक अधिकार''

डॉ. भालचंद्र रूपराव देशमुख
सहयोगी प्राध्यापक,
गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविदयालय पुसद जि. यवतमाळ.

## ▪ प्रस्तावना




भारतीय राज्यघटनेने सर्व नागरिकांना समान अधिकार प्रदान केलेले असून सामाजिक न्यायाची संकल्पना अंगीकारली आहे. अर्थातच सामाजिक समता, समानता प्रस्थापीत करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने दिव्यांगांसाठी विशेष प्रावधान करण्याचे सुध्दा अधोरेखीत केले असून त्याप्रमाणे केंद्र तथा राज्य शासन दिव्यांगांकरीता वेळोवेळी धोरण तयार करीत असते (Laddha, Chaitanya. 2016). या धोरणाचाच एक भाग म्हणून 1996 मध्ये अपंग व्यक्ती (समान, संधी हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम 1996 अस्तित्वात आला. या कायदयामध्ये केवळ 7 दिव्यांगाचे प्रकार समाविष्ट केले होते. त्यामूळे अन्य दिव्यांग; योजनांच्या लाभापासून वंचित राहत होते. यासोबतच अनेक त्रूटी या कायदयामध्ये होत्या. यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने पूढे 2016 मध्ये दिव्यांगांना अधिकार प्रदान करण्याच्या हेतूने, 'दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016' हा कायदा नव्याने तयार करून 7 एप्रील 2017 पासून संपूर्ण देशभर लागु केला. या कायदयानुसार देशाच्या प्रत्येक राज्यातील दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे, समाजातील दुर्लक्षित अपंगांच्या जीवनातील अंधकार दूर करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणावे तसेच, त्यांच्या अपंगत्वाकडे पाहून त्यांच्यामधील असलेले गुणसामर्थ्य विकसित करून त्यांना समाज जीवनाच्या सर्व अंगामध्ये समान संधी, संपूर्ण सहभाग व त्यांच्या हक्कांचे सरंक्षण व्हावे यांसारख्या अनेक दिव्यांग हिताचा मानसन्मान राखून, त्या कायदयाचा लाभ देऊन दिव्यांगांचा सर्वांगीन विकास करता येईल याची काळजी घेण्याचा प्रयत्न या नवीन कायदयाने केला आहे. या कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या हेतून अनेक वैयक्तीक तथा सामूहिक लाभाच्या योजना सूरू करण्यात आल्या असून भारतातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास 2.1 टक्के दिव्यांगांचे जीवनस्तर उंचावण्याचा प्रयत्न केला जातो आहे (Government of Inida, 2015).

या अनुषंगाने प्रस्तूत शोध निबंधातून भारतातील दिव्यांग संकल्पना अभ्यासून त्यांच्या संवैधानीक अधिकारावर प्रकाश टाकण्यात आला आहे. यासाठी दुयम तथ्यांचा उपयोग करण्यात आला आहे.

## ▪ दिव्यांग स्थिती व संकल्पना

दिव्यांगत्व ही केवळ भारतातील समस्या नसून संपूर्ण जगाने या समस्येने लक्ष वेधले आहे. विकसीत देशात एकूण लोकसंख्येच्या 10 ते 20 टक्के लोक दिव्यांग असून विकसनशील देशात हे प्रमाण 1 ते 2 टक्के आढळून येते. यामुळे दिव्यांग हा गट सर्वात मोठा अल्पसंख्यांक गट म्हणून ओळखल्या जातो (Vijayan, Shanimon, Indurajani, 2020). युनिसेफच्या आकडेवारीनूसार जवळपास 80 टक्के दिव्यांग 18 ते 64 वयोगटातील असून हे वय काम करण्याचे असतांना त्यांना अपंगत्वामूळे कामामध्ये सहभाग घेता येत नाही (Nair,

K. R. G., & Anu. P. 2006). पर्यायाने त्याचा परिणाम त्यांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीवर होत असतो. तथा डिसेएल लिव्हींग फाउंडेशनुसार, सन 2017 मध्ये 60 वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकांची संख्या 962 दश लक्ष असून अपंगत्वामूळे यांना परावलंबी जीवन जगावे लागते (Amundson, R. 1992). साधारणतः 2 पैकी 1 अपंग व्यक्ती उपचार घेऊ शकत नाही. त्यामुळे उपचाराअभावी त्यांचे आरोग्य अतिशय नाजूक स्थितीवर येऊन पोहचते. उदरनिर्वाहसाठी अपंग व्यक्ती इतरांवर विसंबुन असल्यामुळे सामाजिक दर्जा सुध्दा खालावलेला असतो तथा त्यांना समाजीक कार्यक्रमांमध्ये फारसे सहभागी करून घेतल्या जात नाही. या लोकामध्ये दारिद्रयाचे प्रमाण अधिक असून आरोग्य, शिक्षण, वाहतूक कामाच्या ठिकाणी भेदभाव अशा अनेक समस्यांचा सामना करावा लागतो तथा अपंगत्व असलेल्या व्यक्तींना वंश, रंग, लिंग, भाषा, धर्म, मालमत्ता, वय या आधारावर सुध्दा अडथळे निर्माण केल्या जातात (Kuvalekar K. 2015).

अपंग व्यक्तींचे जीवनमान सुधारण्यासाठी भारतीय संविधानाने दिव्यांग व्यक्तींना सुध्दा समान अधिकार प्रदान केले आहेत त्यासोबतच विशेष अधिकाराची सुध्दा तरतुद केली आहे. या अधिकाराची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने वेळोवेळी धोरण जाहिर केलेले आहे तथा कायदयाचे पाठबळ सुध्दा दिले आहे (Pandey & Charles, 2019). . यासोबतच अनेक प्रकारच्या शासकीय योजना सुध्दा प्रारंभ केल्या आहेत. असे असतांनाही अपंग व्यक्ती या त्यांचे अधिकाराविषयी जागृत नसतात तथा योजनांच्या लाभापासून वंचित असतात. एकतर त्यांच्यामध्ये शिक्षणाचा अभाव असतो किंवा माहितीचा अभाव तथा दुसऱ्यावर निर्भर असल्यामुळे या लोकांना योजनेविषयी फारशी माहिती असत नाही. पर्यायाने ते लाभापासून वंचित राहून सामाजिक आर्थिक स्तरावर निम्न जीवन जगतात. अपंग मुलांच्या बाबतीत तर ही स्थिती अधिकच गंभीर आहे. युनिसेफच्या मते, जगातील सुमारे 240 दशलक्ष मुलांना अपंगत्व आहे. म्हणजेच प्रत्येक दहा मुलांमागे एक मुल अपंग आहे (Bhavana , Kamath & Otheres, 2021).. या मुलांमध्ये जवळपास 49 टक्के मुले कधीही शाळेत जाऊ शकणार नाही अशा स्थितीत आहेत. युनिसेफ ने दर्शविलेली स्थिती जर ग्राहय धरली तर तर जवळपास 120 दशलक्ष मुले शिक्षणापासून वंचित राहणार असून त्याचा सरळ संबंध त्यांच्या भाविश्वावर होऊन त्यांचा जीवनस्तर अतिशय निम्न प्रकारचा असणार आहे (Laskar, Gupta, Kumar, Sharma and Singh 2010). जागतीक स्तरावरील ही स्थिती भारतात सुध्दा कमी अधिक प्रमाणात सारखीच असून यांच्या उत्थानासाठी प्रयत्न करणे नितांत आवश्यक आहे.

## ▪ भारतातील दिव्यांगः सांख्यिकीय स्थिती

युनिसेफच्या पाहणीनुसार दक्षिण आशियामधील 10 टक्के लोक कोणत्या ना कोणत्या अपंगत्वाने बाधित आहेत. यामध्ये अपंगत्वाचे सर्वाधिक प्रमाण भारतात आहे. 2001 मध्ये देशात 2.19 कोटी लोक (2.13 टक्के) अपंग होते. त्यामध्ये वाढ होऊन 2011 मध्ये देशात 2.68 कोटी लोक (2.21 टक्के) अपंग आढळले. यापैकी 50.3 लाख अंध (00.42 टक्के), 50.7 लाख कर्णबधीर (0.42 टक्के), 19.9 लाख मुके (00.17 टक्के), 54.4 लाख हातापायाने अपंग (00.45 टक्के), 15 लाख मतिमंद (00.12 टक्के), 7 लाख मनोरूग्ण (00.06 टक्के), 21 लाख बहुविकलांग (00.17 टक्के), व 49 लाख इतर प्रकाराने अपंग होते. Internationla Disability Rights Monitor (IDRM) च्या मतानुसार यातील शारीरिक अपंगत्व असलेले 74 टक्के व मानसिक अपंगत्व असलेले 94 टक्के लोक 'बरोजगार' आहेत. अर्थव्यवस्थेच्या विकासात सर्वाधिक व्यावर्तन झालेला गट म्हणजे 'अपंग'. अपंग व्यक्तींचे समावेशन करणे ही भारतासारख्या देशाला अत्यावश्यक बाब आहे. भारतात अपंगत्व हे गरिबीचे कारण व गरिबीचा परिणाम राहिलेले आहे.

सारणी 1

राज्यनिहाय दिव्यांगांचे प्रमाण

| अक | राज्य | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र | 1.6 |
| 2 | झारखंड | 1.7 |
| 3 | दिल्ली | 1.7 |
| 4 | पंजाब | 1.7 |
| 5 | कर्नाटक | 1.8 |
| 6 | आंध्रप्रदेश | 1.8 |
| 7 | छत्तीसगढ | 2.0 |
| 8 | गुजरात | 2.1 |
| 9 | उत्तर प्रदेश | 2.1 |
| 10 | हरियाना | 2.2 |
| 11 | बिहार | 2.3 |
| 12 | उत्तरांचल | 2.3 |
| 13 | प. बंगाल | 2.3 |
| 14 | मध्य प्रदेश | 2.3 |
| 15 | राजस्थान | 2.5 |
| 16 | हिमाचल प्रदेश | 2.6 |
| 17 | तामिळनाडू | 2.6 |
| 18 | केरळ | 2.7 |
| 19 | ओरिसा | 2.8 |
| 20 | जम्मू काश्मिर | 3.0 |
| **21** | **भारत** | **2.1** |

(स्त्रोतः जनगणना, 2001)

## दिव्यांग संकल्पना

**दिव्यांग कायदा 2016 नुसार**– ''दिव्यांग म्हणजे दिर्घकालीन शारीरिक, मानसिक, बौध्दीक किंवा संवेदनेचे अपंगत्व असणारी व्यक्ती ज्यामुळे अडथळयांशी संवाद साधताना, समाजात इतरांच्या बरोबरीने पूर्ण आणि प्रभावी सहभाग घेण्यात त्यांना अडथळा होतो''.

## ■ दिव्यांग व्यक्तीचे संवैधानिक अधिकार

समाजातील सर्व व्यक्तींना समता, स्वातंत्र्य, न्याय आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी यासाठी संविधान कंटीबध्द आहे. सर्वसमावेशक समाजनिर्मितीसाठी याबाबी आवश्यक आहेत आणि यामध्ये वंचित समाजघटकांचा ही समावेश होतो. संविधानातील दिव्यांग व्यक्ती संदर्भातील कलम 41 चा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. या कलमानुसार राज्य हे रोजगाराचा हक्क शिक्षणाचा हक्क आणि बेरोजगारी, वृध्दापकाळ, आजारपण काळामध्ये सार्वजनिक मदतीची तरतूद करेल असे नमुद केले आहे.

रोजगारासाठी निःसमर्थ आणि विकलांग व्यक्तींना सहाय्य हा विषय संविधानाच्या 7 व्या परिशिष्ठातील 'राज्यसूची' मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

## ▪ कायदेशीर अधिकार

1. दिव्यांग (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) कायदा 1995 हा विकलांगाविषयी निगडीत असणारा एक महत्वाचा कायदा आहे. या कायदयान्वये विकलांगांना समान संधी, त्यांच्या अधिकारांचे / हक्कांचे संरक्षण आणि राष्ट्र बांधणीच्या प्रक्रियेतील त्यांचा सहभाग यांची हमी देण्यात आली आहे. या कायदयामध्ये पुढील चार तरतुदींचा समावेश होतो–

**अ.** विकलांगत्वाचे लवकरात लवकर निदान आणि प्रतिबंध

**ब.** विकलांगांसाठी शिक्षण, रोजगार समान वागणूक अणि सामाजिक सुरक्षा

**क.** केंद्र आणि राज्य पातळीवर समन्वय समिती आणि कर्मचारी समित्यांची विकलांगांसाठी धोरणे ठरविण्यासाठी स्थापना

**ड.** केंद्रीय पातळीवर विकलांगांसाठी मुख्य आयुक्त व राज्य पातळीवर आयुक्तांची नेमणुक

2. **Autism, Cerebral Palsy, Mental Retardation** यांनी ग्रस्त अशा रूग्णांसाठीचा राष्ट्रीय न्यास आणि मल्टीपल डिसॲबिलीटीस ॲक्ट, 1999 यामार्फत वरील आजारांनी पीडीत अशा रूग्नांसाठीच्या कल्याणासाठी एका राष्ट्रीय न्यासाची स्थापना करण्यात आली आहे. अशा रूग्णांना स्वतंत्रपणे स्वावलंबी जीवन जगता यावे, प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे तसेच या रूग्नांच्या सेवेसाठी कायदेशीर पालकांची नियुक्ती करण्यासाठी हा न्यास काम करतो.

3. **भारतीय पुनर्वसन परिशद कायदया (1992)** नुसार या परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. पनुर्वसनासंबंधी कामाचे नियंत्रण, देखरेख करणे आणि या कार्यातील संशोधनाला चालना देणे, हे या परिषदेचे कार्य आहे.

4. **मानसिक आरोग्य कायदा (1987)** हा मानसिकदृष्टया विकलांग लोकांसाठीचे उपचार व सुश्रूशा याविषयी संबंधीत आहे. हा कायदा मनोरूग्णांचे इस्पितळातील प्रवेशाचे नियंत्रण करतो व अशा रूग्णांच्या अधिकारांचे संरक्षण करतो.

5. **विधिसेवा अधिसत्ता कायदया (1987)** नुसार विकलांगांना मोफत कायदेविषयक सल्ला पुरवला जातो (Bhattachayya 2014)

### 6. अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम 2016

16 डिसेंबर 2016 ला भारतीय संसदेने ''अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम 2016 हा कायदा संमत केला. अपंगांसंदर्भात अस्तित्वात असलेल्या 1995 च्या कायदयामध्ये काही त्रृटी होत्या. हा कायदा सर्व प्रकारच्या अपंगांना न्याय मिळवून देण्यात अपयशी ठरत असल्याच्या तक्रारी सातत्याने उठत असल्याने शेवटी 2016 या अस्तित्वात असलेल्या कायदयात बदल करून ''अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम 2016 हा कायदा पारीत केल्या गेला. या कायदयाने अपंगांचे प्रकार वाढविलेत. यामध्ये एकूण या कायदयाने अपंगांसंदर्भात होत असलेला भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला असून अपंगांसाठी स्वतंत्र निधीची व्यवस्था केली आहे ज्यामाध्यमातून अपंगांच्या अधिकाराचे संरक्षण होवून त्यांना सुरक्षा प्रदान केली जाते.

## ▪ निष्कर्ष–

दिव्यांग ही संकल्पना अतिशय व्यापक असून दिव्यांग या संकल्पनेमध्ये कोणाचा समावेश करावा यासाठी शासनाने वेळोवेळी परित्रक जाहीर केलेले आहे तथा कायदयाने सुध्दा 'दिव्यांग' या शब्दाची व्याख्या केलेली आहे. यानुसार भारतातील दिव्यांगाची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याचे दिसून येत असून त्यांचे जीवन आनंददायी करण्याचा प्रयत्न संविधानाने केलेला आहे. भारतीय संविधानात दिव्यांगासाठी विशेष प्रावधान केलेले असून संवैधानिक अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी कायदे सुध्दा तयार केलेले आहेत. यामाध्यमातून दिव्यांगांना एक मानव म्हणून जगण्याचा मार्ग प्रशस्त केलेला आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची–

1. Amy Raub, Isabel Latz, Aleta Sprague, Michael Ashley Stein, (2016).Constitutional Rights of Persons withDisabilities: An Analysis of 193. National Constitutions. Harvard Human Rights Journal / Vol. 29-
2. Amundson, R. (1992). Disability, Handicap, and the Environment. Journal of Social Philosophy, 23 (1), 105–19.
3. Aditi Nath,(2017). Socio-Economic Situation of Persons with Disability in Cachar District of Assam. Educational Quest: An Int. J. of Education and Applied Social Science: Vol. 8, No. 2, pp. 575-581, August 2017
4. Bhattacharyya Rajib.(2014).Disability Laws in India: A Study. International Journal of Research (IJR) Vol-1, Issue-4, May.
5. Bhavana Madireddy Lakshmi, Kamath Akshara, Badigineni Saumya, Nayak Arijit, Jain Akshay. (2021). An empirical study on disability schemes in India.LexForti Legal News Network.January 15.
6. Government of Inida(2015).First Country Report on theStatus of Disability in India. Ministry of Social Justice and Empowerment Department of Empowerment of Persons with Disabilities. New Delhi.
7. Kothari, Jayna.(2010). The Un Convention On Rights Of Persons With Disabilities: An Engine for Law Reform in India.Economic and Political Weekly.Vol. 45, No. 18 (MAY 1-7), pp. 65-72,Published By Economic and Political Weekly
8. Kuvalekar K. (2015). "Quality of Life among Persons with Physical Disability in UdupiTaluk: ACross Sectional Study" Journal of Family Medicine and Primary Care , Vol 4, issue 1, pp :69
9. Laddha, Chaitanya. (2016). Rights of Person with Disabilities: A Human Right Approach. March 29, . Available at SSRN: https://ssrn.com/abstract=2763440 or http://dx.doi.org/10.2139/ssrn.2763440
10. Laskar A.R., Gupta V.K., Kumar D., Sharma N. and Megha M. Singh. (2010) "Psychosocial Effect and Economic Burden on Parents of Children with Locomotor Disability" Indian Journal of Pediatrics, Vol 77, pp: 529-533.
11. Nair, K. R. G., & Anu. P. (2006). Characteristics of Entrepreneurs - AnEmpirical Analysis. Journal of Entrepreneurship, 15 (1), 47-61.doi:10.1177/097135570501500104
12. Pandey Ruchika & Charles. (2019). A Critical Study Of Legal Rights Of People With Disabilities: Indian Scenario. International Journal Of Research And Analytical Reviews. Volume 6 Issue, Jan.–March
13. Vispute, Shekhar Bhagwan. (2021). The Problems Of Differently-Abled Persons In India And Remedies For The Empowerment. International Journal of Multidisciplinary Educational Research. Issn:2277-7881; Impact Factor :7.816(2021); Ic Value:5.16; Isi Value:2